सकाळ



हॅप्पी पेरेंटिंग...

डॉ. सुनील गोडबोले



# पालकत्वाच्या पिढ्या...

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

Published on : 7 January 2023

असं म्हणतात, की पालकत्वाच्या संकल्पना प्रत्येक पिढीनुसार बदलतात. साधारणतः १५ ते ३० वर्षांमध्ये एक पिढी (जनरेशन) बदलते. अभ्यासकांनी त्या-त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे त्या त्या पिढीला छान नावे दिली आहेत आणि त्या वेळच्या पालकत्वावर सुंदर भाष्य केलंय.

**हरवलेली पिढी (Lost Generation)** : इसवी सन १८८३ ते १९०० मध्ये जन्मलेली ही पिढी तरुण वयात पहिलं महायुद्ध लढली. तेव्हाचे लोकप्रिय लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे यांनी त्यांच्या पुस्तकात त्या पिढीचा प्रामुख्याने उल्लेख केलाय. तेव्हाची कुटुंबपद्धत ही ‘बाबा’ हे कुटुंबप्रमुख आणि एकटे कमवणारे, तर ‘आई’नं घर आणि मुलं सांभाळायची अशी होती. यात एकत्र कुटुंबपद्धती म्हणजे आजीआजोबा- आईवडील- नातवंडं अशा तीन पिढ्या एकत्र नांदत होत्या! दुर्दैवानं पहिल्या महायुद्धात त्यातले कमवते ‘बाबा’ मारले गेल्यावर ही पिढी ‘हरवलेली’, दिशाहीन बनली.

**जीआय/ ग्रेटेस्ट पिढी (G.I./ Greatest Generation) :** इसवी सन १९०१ ते १९२७ मध्ये जन्मलेल्या पिढीनं जागतिक मंदी, स्पॅनिश फ्लूसारखी साथ यांचा सामना करावा लागला; पण त्याच पिढीनं रेडिओ, फोन,

वाहनांचा शोध लावला आणि पुढे जाऊन त्याच पिढीनं दुसऱ्या जागतिक महायुद्धात सर्वनाश अनुभवला. ‘कुटुंब पहिलं’ मानणाऱ्या त्या पिढीतल्या आई-वडिलांना प्रचंड कष्ट आणि आर्थिक ताणतणाव अनुभवायची वेळ आली. रस्त्यावरच्या दिव्याखाली अभ्यास करून मोठी होणारी हीच ती पिढी.

मूक पिढी (Silent Generation): इसवी सन १९२८ ते १९४५ गध्ये जन्मलेल्या या पिढीला आर्थिक चणचण, सरकारी निर्बंध, साम्यवाद या सगळ्याशी लढावं लागलं. याच काळात ‘एक या दो बस!’ असा विचार पालक करू लागले. ‘अंथरूण पाहून पाय पसरा!’ हे ब्रीदवाक्य असलेले त्या पिढीतले आई-वडील मुलांना मात्र जागरूकपणे वाढवू लागले.

**बेबी बूमर पिढी (Baby Boomer Generation):** इसवी सन १९४६ ते १९६४ या काळातील या पिढीने झपाट्यानं बदलणारं जग बघितलं. त्या बरोबरीनं झपाट्यानं वाढणारी लोकसंख्याही अनुभवली. आधीच्या पिढ्यांच्या मानानं खूप शिकलेली ही पिढी, आता पालक म्हणून सजग बनली. या पिढीतल्या आई-वडिलांनी आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. ‘मुलांना वेळ द्या’ ही संकल्पना याच काळातली.

अशाच प्रकारे पुढे पिढ्या आणि त्याबरोबर पालकत्वाची तत्त्वंही कशी बदलली त्याबद्दल तुम्हाला उत्सुकता असेलच. ते बघू या पुढच्या भागात.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)